# प्रेसनोट

## विमानतळ पो.स्टे हद्दीत "सनबर्न ११" यांचे कार्यक्रमास परवानगी नाकारलेबाबत

"सनबर्न ११" यांनी दिनांक २८ ,२९, ३० ,३१ डिसेंबर २०१७ रोजी महालक्ष्मी लॉन नगररोड वाघोली जकातनाक्यासमोर लोहगाव पुणे येथे म्युझिक फेस्टिवल आयोजित करणेबाबत परवानगी मिळणेबाबत रोहन हवाल यांनी दि १०/११/२०१७ रोजी केलेला अर्ज हा विमानतळ पोलीस स्टेशनला प्राप्त झालेला आहे.

सदर कार्यक्रमाबाबत माहीती घेता सदरचा कार्यक्रम हा तरुण मुले मुलींना आकर्षित करणारा कार्यक्रम असून सदर कार्यक्रमामध्ये म्युझिक,मनोरंजन, खेळ, खादय पदार्थ ,नवीन वस्तु खरेदी वगैरे गोष्टी मुळे सदर कार्यक्रमामध्ये तरुण वर्ग आकर्षित होत असून सदर कार्यक्रमास सुमारे ५० ते ६० हजार लोक दररोज येण्याची शक्यता आहे.सदर कार्यक्रमामुळे तरुण पिढी व्यसनाधिन होत असल्यामुळे सदर कार्यक्रमास **सदर भागातील विविध संघटनेंनी, विविध पक्षांनी व स्थानीक नागरींकानी विरोध दर्शविण्यास सुरुवात केलेली आहे.**

तसेच सदर कार्यक्रमांचे ठिकाणापासून नागरी विमानतळ व लष्करी विमानतळ हे १ कि.मी चे अंतरावर असुन सदर परिसर हा प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केलेला असून सदर भागामधून लष्करी व नागरी विमाने यांचे ये जा सतत चालू असते. **कार्यक्रमाचे ठिकाण हे विमान उतरताना किंवा उडतानाचे अंतर हे जमिनीपासून खुप कमी असते त्यामुळे लष्करी व नागरी विमानांना धोका संभवून लोकांचे जिवितास धोका पोहचू शकतो.** कार्यक्रमामध्ये लेझर लाईट आकाशात सोडली जात असल्याने विमानांना विमानतळावर उतरताना अडचणी येवून सदर विमाने ही आकाशात भरकटू शकतात. त्यामुळे सदर **एअरपोर्ट ऑथॉरिटी,सीआयएसएफ व एअर फोर्सने प्रतिबंधक क्षेत्र असल्यामळे सदर कार्यक्रमास आक्षेप घेतलेला आहे.** लष्करी विमानतळ व नागरी विमानतळ या ठिकाणी अतिरेकी संघटनाकडुन धोका असलेबाबत यापुर्वी इनपुट प्राप्त झालेले आहे. तसेच **सदर कार्यक्रमामध्ये होणाऱ्या गर्दीमुळे अतिरेकी संघटना याचा फायदा घेऊन सदर ठिकाणी अतिरेकी संघटनाकडुन धोका पोहचण्याची शक्यता नाकारता येत नाही.** तसेच सदर कार्यक्रमाचे ठिकाणापासुन अर्धा किलोमिटरवर पुणे अहमदनगर हा राज्य महामार्ग जात असुन **सदर कार्यक्रमामुळे त्या ठिकाणी रहदारीची व वाहतुकीची मोठया प्रमाणात समस्या निर्माण होऊ शकते** इत्यादी कारणावरुन "सनबर्न ११" या कार्यक्रमास परवानगी नाकारण्यात आली आहे.